MHST140036322024

श्रीमती ए. बी. पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्रीमती एम. ए. अहिवळे, आरोपीतर्फे विधीज्ञ.

---

**न्यायनिर्णय**
(दिनांक ३०.०६.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.

२. माझे विचाराधीन उद्‌भवलेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करू शकला का की, दि.२९.०८.२०२४ रोजी मौजे सोमंथळी, ता.फलटण, जि.सातारा गावचे हद्दीत आरोपी हा त्याच्या राहत्या घराशेजारील बाजूस त्याचे ताब्यात बेकायदेशीररित्या प्रत्येकी ९० मि.ली. क्षमतेच्या देशी दारु सखू संत्राच्या एकूण ८७ सिलबंद बाटल्या एकूण किंमत र.रु. ३,०४५/– चा माल विना परवाना चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने कब्जात बाळगले स्थितीत मिळुन आला? | .....नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीला दोषमुक्त करण्यात येते. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबत :–**

३. सदर प्रकरणी अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले ते म्हणजे सा.क्र.१ – आप्पासो चंद्रकांत काळे, (फिर्यादी) व सा.क्र.२ – विलास साहेबराव भोसले, (पंच साक्षीदार).

४. आप्पासो चंद्रकांत काळे – साक्षीदार क्र.१ तथा फिर्यादी यांनी

त्यांच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, दि.२९.०८.२०२४ रोजी ते दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, फलटण क्र.१ येथे जवान या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी कार्यालयामध्ये हजर असताना दुय्यम निरीक्षक, फलटण यांनी त्यांना बोलावून घेवून सांगितले की, खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली आहे की, मौजे सोमंथळी, ता.फलटण येथे आरोपी हा त्याच्या घरासमोर बेकायदेशीर दारुची विक्री करत आहे. सदर बातमी मिळाल्यानंतर दुय्यम निरीक्षक यांनी दोन पंचांना बोलवून घेतले व त्यांना वरील बातमीचा आशय कळवून पंच म्हणून हजर राहण्यास सांगितले. त्यानंतर दुय्यम निरीक्षक व दोन पंच असे वरील बातमी मिळालेल्या ठिकाणी खाजगी वाहनाने गेले. वाहन बातमीच्या ठिकाणापासून दुरवर लावले व पायी चालत गेले असता सदर ठिकाणी १३.३० वाजता छापा टाकला असता आरोपी हा त्याच्याजवळ एक कापडी पिशवी घेवून बसलेला दिसला. दुय्यम निरीक्षक यांनी आरोपीला येण्याचा उद्देश समजावून सांगून आरोपीजवळील कापडी पिशवीमध्ये काय आहे हे पाहिले असता त्यामध्ये ९० मि.ली. क्षमतेच्या देशी दारु सखू संत्रा कंपनीच्या ८७ बॉटल असा एकूण र.रु.३०४५/- मुद्देमाल मिळून आला. मिळून आलेल्या मुद्देमालातून दोन सिलबंद बाटल्या घेवून त्यावर पंचांच्या व दुय्यम निरीक्षक यांच्या सह्यांचे सिललेबल लावून लाखी सिल लावून रासायनिक तपासाणीसाठी काढून ठेवले. त्यानंतर आरोपीला त्याचे नाव गाव विचारले असता आरोपीने त्याचे नाव प्रविण मरिबा शेळके असे सांगितले. त्यानंतर त्यांनी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द फिर्याद निशाणी क्र.१२ दिली. त्यानुसार प्रथम खबर अहवाल निशाणी क्र.१३ दाखल करण्यात आला. सदर साक्षीदार क्र.१ तथा फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, पंचांना फोन दुय्यम निरीक्षक यांनी केले होते. पंचांचे फोन नंबर दुय्यम निरीक्षक यांचेकडे आहेत किंवा कसे हे त्यांना माहित नाही. त्यांच्यासमक्ष दुय्यम निरीक्षक यांनी पंचांना फोन केला नाही. पंचांना किती वाजता फोन केले हे त्यांना सांगता येत नाही. दुय्यम निरीक्षक यांना किती वाजता बातमी समजली हे त्यांना सांगता येत नाही. रेडपार्टीची नावे त्यांच्या फिर्यादमध्ये नमुद नाहीत. रेड कामी जाण्यापूर्वी त्यांनी बोगस गिऱ्हाईक पाठविले नव्हते. घटनास्थळाचा सर्व्हे नंबर, मालमत्ता नंबर व गट नंबर त्यांना सांगता येत नाही. ते १४.४० वाजता कार्यालयामध्ये आले व नंतर फिर्याद दिली. रासायनिक तपासणीकामी नमुना किती तारखेला पाठविला हे त्यांना सांगता येत नाही. रासायनिक तपासाणीसाठी बॉटल किती दिवसांनंतर पाठविल्या हे देखील त्यांना सांगता येत नाही. घटनास्थळ चतुःसिमा त्यांना सांगता येत नाहीत.

५. विलास साहेबराव भोसले - साक्षीदार क्र.२ हे पंच साक्षीदार आहेत, त्यांनी त्यांच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, दि.२९.०८.२०२४ रोजी दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, फलटण यांनी

त्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये पंचनामा करण्यासाठी बोलविले नव्हते. दुय्यम निरीक्षक यांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला नाही. दुय्यम निरीक्षक यांनी त्यांची कार्यालयामध्ये सही घेतली होती. सदर साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला असता त्यांनी पंचनाम्यातील संपुर्ण मजकुर नाकारुन केवळ त्यावरील सही निशाणी क्र.१४ मान्य केली. सदर साक्षीदार हे आपल्या साक्षीद्वारे त्यांच्या पुर्व कथनारुप साक्ष न दिल्याने सरकारी वकीलांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले असता दि.२९.१०.२०२४ रोजी दुय्यम निरीक्षक यांनी त्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून हजर राहण्यासाठी बोलविल्याचे, त्यादिवशी ते व लतिफ दादा शेख असे दोन्ही पंच म्हणून हजर राहण्यासाठी तयार झाल्याचे, दुय्यम निरीक्षक, रेडींग स्टाफ व ते सर्व मिळून खाजगी वाहनाने मौजे सोमंथळी येथे रेल्वेलाईन जवळ गेल्याचे, सदर ठिकाणी गाडी पार्क करुन चालत गेल्याचे, १३.३० वाजता छापा टाकला असता एक इसम पिशवी घेवून बसलेला दिसून आल्याचे, त्यामध्ये दुय्यम निरीक्षक यांनी पाहणी केली असता ९० मि.ली. क्षमतेच्या ८७ सिलबंद बाटल्या मिळून आल्याचे, दुय्यम निरीक्षक यांनी त्या इसमाला दारु बाळगण्याचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने नाही असे सांगितल्याचे, त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रविण मरिबा शेळके, रा. सोमंथळी असे सांगितल्याचे, सदर ठिकाणी दोन सिलबंद बाटल्या रासायनिक तपासणीसाठी त्यांच्यासमक्ष काढून घेवून त्या जप्त केल्या व तो पंचनामा त्यांना वाचून दाखविला व नंतर त्यांनी त्यावर सही केल्याचे, हे सर्व सदर साक्षीदाराने स्पष्टपणे नाकारले. सदर साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, दि.२९.०८.२०२४ रोजी ते त्यांच्या मजुरी कामासाठी बाहेरगावी गेले होते.

६. अभियोग पक्षास पंच साक्षीदार क्र.२ विलास साहेबराव भोसले यांनी सहकार्य केले नाही व फितुर झाले त्यामुळे घटनास्थळ जप्ती पंचनामा पुर्णतः शाबीत झाला नाही.

७. जरी साक्षीदार क्र.१ तथा फिर्यादी आप्पासो चंद्रकांत काळे यांनी अभियोग पक्षाला मदत केली असली तरी पंच साक्षीदार क्र.१ विलास साहेबराव भोसले यांनी अभियोग पक्षाला मदत केली नाही. त्यामुळे उभय साक्षीदारांच्या साक्षीमध्ये समानता दिसत नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता इतर साक्षीदारांच्या साक्ष नोंदविणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय ठरले असते. सदर जप्त मुद्देमाल हा देशी दारू आहे, हे दर्शविणारा अहवाल अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर खटल्यामध्ये काहीही तात्पर्य उरलेले नाही. तरी अभियोग पक्षाचा पुरावा तसा वेगळा आदेश निशाणी क्र.१ वर करुन संपविण्यात आला. वरील सर्व चर्चेवरुन, असेच निष्पन्न होते की, पुराव्या अभावी, अभियोग पक्ष आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास

असमर्थ ठरला आहे. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** :–

८. साक्षपुराव्यावर आधारीत वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ च्या कलम ६५(ई) चे घटक सिध्द करू शकले नाही.

९. त्याचप्रमाणे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे या न्यायनिर्णयाविरोधात अपील दाखल झाल्यास, त्यात हजर राहण्याची हमी म्हणून आरोपीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी र.रू. १५,०००/– च्या वैयक्तिक बंधपत्र द्यावे असा आदेश देणे उचित ठरेल. अंतीमतः मुद्दा क्र.२ च्या उत्तरा दाखल, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) आरोपी प्रविण मरीबा शेळके यास महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ कलम ६५(ई) मधील गुन्ह्यामधून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) जप्त केलेला मुद्देमाल अपीलाचा कालावधी संपल्यानंतर जिल्हा उत्पादन शुल्क विभाग, सातारा यांच्याकडे कायद्याप्रमाणे नष्ट करण्यासाठी पाठविण्यात यावा व इतर निरर्थक मुद्देमाल असल्यास अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नाश करावा.

४) अपील दाखल झाल्यास, आरोपीने त्यात हजर राहाण्याची हमी म्हणुन ६ महिन्याच्या कालावधीसाठी र.रू.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) ची पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JADHAV JITENDRA NATHA
DN: cn=JADHAV JITENDRA NATHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949664, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.06.30 15:09:58 +0530

फलटण.
दिनांकः– ३०.०६.२०२६

( श्री. जे. एन. जाधव )
४ थे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
फलटण

सं.फौ.ख.क्र.९४/२०२५ (न्यायनिर्णय)
निशाणी क्र.०७ खाली

# CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original Judgment / order. | | |
| Name of the Stenographer | : | P. S. Lalage |
| Name of the Court | : | $4^{th}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Phaltan |
| Date of Judgment / order | : | 30.06.2026 |
| Judgment / order uploaded on | : | 30.06.2026 |

.....